ePaper

**“...तर हा देश नालायक लोकांच्या हातात जाईल”:उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल**



| वर्ष - 7 । अंक - 89 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- ' गांधीजींसारखा दुसरा होणे नाही'
- इम्फाळमध्ये मैतेईंचा मोर्चा
- आकांक्षाच्या आईची आकांक्षा
- सेन उपांत्य फेरीत पराभूत

www.mahaenews.com । रविवार , दिनांक 30 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पावसाच्या साचणाऱ्या पाण्यामुळे उद्योजक हैराण!

## »उद्योजकांमध्ये संताप : ‘एमआयडीसी’सह पिंपरी-चिंचवड महापालिकेचे दुर्लक्ष

ग्राऊंड रिपोर्ट







।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसाच्या साठलेल्या पाण्याचा फटका भोसरी एमआयडीसीमधील डायमंड क्राफट्स कंपनीला बसला आहे. पाण्यामुळे कंपनीची सुरक्षा भिंत पडली आहे. कामगारांनी देखील त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे डासोत्पत्ती वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे साथीचे आजार पसरून त्याचा त्रास होण्याची भिती कामगारांमध्ये आहे. एमआयडीसी व महापालिकेच्या या कारभाराविरोधात उद्योजक व कामगार तीव्र संताप व्यक्त करत आहेत.**







पावसाच्या पाण्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील औद्योगिक परिसरातील रस्त्यांची चाळण झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. त्यामध्ये पाणी साचल्याने समस्यांची नवीन भर पडत आहे. एमआयडीसी परिसरातील अनेक कंपन्या पुढील साचून राहिलेल्या पावसाच्या पाण्याचा योग्य पद्धतीने निचरा होत नाही. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या परिसरात मोठ्या प्रमाणात ही समस्या भेडसावत आहे.

या कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या एमआयडीसीतील डायमंड क्राफ्टसफ. कंपनीसमोर पावसाचे पाणी खुप दिवसांपासून कंपनीच्या समोरील रस्त्यावर साचलेले आहे. पाऊसाचे प्रमाण वाढल्यास पाण्याचा प्रवाह वाढून सर्व पाणी कंपनीमध्ये येत आहे. त्यामुळे कामगारांना काम करणे कठीण होत असून कंपनीचे मोठे नुकसान होत आहे. खड्डयात पाणी साठल्यामुळे ये-जा करणाऱ्या वाहनांना रस्त्याचा अंदाज येत नाही. सायंकाळच्या वेळी किरकोळ अपघाताच्या घटना देखील घडत आहेत.

हे पाणी कंपनीमध्ये आल्यामुळे कंपनीची सुरक्षा भिंत देखील पडण्याची घटना घडली. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे कंपनीकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे या बाबत त्वरीत पाण्याचा योग्यरित्या निचरा होण्यासाठी उद्योजक मागणी करत आहेत. पाणी साठून राहिल्यामुळे साथीचे आजार मोठ्या प्रमाणात पसरण्याचा धोका वाढला आहे. या समस्यांवर काही ठोस उपाययोजना करण्याची मागणी उद्योजक करत आहेत.

## एमआयडीसी व महापालिकेची ऐकमेकांवर चालढकल...

»सुविधा देण्याबाबत एमआडीसी व महापालिका एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहे. त्यामुळे उद्योजकांची अवस्था ना घर का ना घाट का, अशी झाली आहे. वास्तविक पाहता दोन्ही शासकीय संस्थांनी त्यांच्या अधिकारात येणारी जबाबदारी पार पाडून उद्योजकांना जगविणे गरजेचे आहे. अन्यथा उद्योग स्थलांतर होण्याच्या घटनेत आणखी वाढ होईल, असे उद्योजक सांगत आहेत.

## कर घेऊनही सुविधा नाही...

»पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून उद्योजकांसाठी मोठा कर आकारला जात आहे. त्या मोबदल्यात उद्योजकांना रस्ते, पाणी आदीसह मुलभूत सुविधांचा पुरवठा करणे आवश्यक आहे. मात्र त्याकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत आहे. कर भरूनही सुविधा मिळत नसतील तर कर का भरावा असा प्रश्न उद्योजक उपस्थित करत आहेत.

# रस्ता खचला; विकास लांबणीवर!

## » ‘बिल्डर’कडून रस्त्याची भरपाई: महापालिका प्रशासनाची कारवाई

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बांधकामासाठी खोदलेल्या खड्ड्यात रस्ता खचल्याची घटना गेल्या आठवड्यात पिंपळे सौदागर येथे घडली होती. त्यात महापालिकेचे किती नुकसान झाले, याची माहिती बांधकाम परवानगी विभागाने ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयाला मागितली आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर संबंधित बांधकाम व्यावसायिकाकडून रस्त्याची नुकसान भरपाई वसूल केली जाणार आहे. दरम्यान, हा रस्ता ‘अर्बन स्ट्रीट डिझाईन’ योजनेनुसार विकसित केला जाणार होता.**



त्याबाबत नागरिकांच्या हरकती व सूचना महापालिकेने मागवल्या आहेत. मात्र, त्यापूर्वीच रस्ता खचल्याने त्याच्या विकासाचा मुद्दा लांबणीवर पडला आहे. केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेत पिंपळे सौदागर परिसराचा समावेश झाला आहे. यापूर्वीच बहुतांश आयटीयन्स व नोकरदारांनी या भागाला पसंती दिली आहे. स्मार्ट सिटी अंतर्गत होत असलेल्या विकासकामांमुळे त्यात आणखी भर पडणार आहे. त्यामुळे हा परिसर नेहमी गजबजलेला असतो. उच्चभ्रू सोसायट्यांची संख्या अधिक आहे. अशा भागातील कुणाल आयकॉन सोसायटी रस्त्यालगत बांधकामासाठी खोदकाम केलेल्या ठिकाणचा रस्ता १९ जुलैच्या सकाळी खचला. खड्डयाला केलेले पायलिंगही कोसळले. महापालिकेची जलवाहिनी व सांडपाणी वाहिन्या फुटल्या. मोठे नुकसान झाले. या प्रकरणी बांधकाम व्यावसायिकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

कार्यकारी अभियंत्याची बदली

पिंपळे सौदागर परिसर महापालिकेच्या ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रात येतो. तेथील स्थापत्य विभागाची जबाबदारी कार्यकारी अभियंता विलास देसले यांच्याकडे होते. रस्ता खचल्यानंतर चारच दिवसांनी त्यांची बदली जलनिःसारण विभागात करण्यात आली. ‘क’ क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता देवण्णा गट्टूवार यांच्याकडे ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे. त्यांच्याअंतर्गत पिंपळे सौदागर येथील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे.

असा आहे रस्ता

लांबी : दीड किमी, रुंदी : १८ मीटर

> असा होणार रस्ता मुख्य रस्ता दुहेरी मार्ग सायकल ट्रॅक व पदपथ पिंपळे सौदागर येथील रस्ता पाच-सहा वर्षांपूर्वी केला आहे. तो खचल्यामुळे किती नुकसान झाले, याची माहिती बांधकाम परवाना विभागाने मागितली आहे. त्याबाबतचा अहवाल तयार केला जात आहे.
> **- देवण्णा गट्टूवार,** कार्यकारी अभियंता,

> ‘क’ व ‘ड’ क्षेत्रीय कार्यालय, महापालिका शहरातील काही रस्ते अर्बन स्ट्रीट डेव्हलपमेंट योजनेनुसार केले जाणार आहेत. त्यात पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॉन रस्त्याचाही समावेश आहे. त्याबाबत नागरिकांच्या सूचना व हरकती मागवल्या आहेत. - प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता, स्थापत्य प्रकल्प विभाग, महापालिका
> पिंपळे सौदागर येथील रस्त्याची पुनर्विकास प्रक्रिया सुरू आहे. तो कशा पद्धतीने करायचा? किती खर्च येणार? स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत करायचा की महापालिकेने करायचा यावर चर्चा झाली होती.
> **- मकरंद निकम,** शहर अभियंता, महापालिका


---

# बारामती येथे रविवारी ऐतिहासिक कार्यक्रमात उलगडणार सगर राजपूत समाजाची यशोगाथा

## » संगीतातून समाजाचा महाराष्ट्रातील इतिहास मांडणार

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती येथे क्षत्रिय सगर राजपूत (सगर मराठा) संघटनेच्या वतीने ‘क्षत्रिय सगर सुर्यवंशी यशोगाथा’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुजरात येथील प्रसिद्ध लोककलाकार मंगलभाई राठोड आणि त्यांचे सहकलाकार संगीतमय कार्यक्रमातून सगर राजपूत समाजाचा महाराष्ट्रातील इतिहास मांडणार आहेत. रविवार ३० जुलै २०२३ रोजी चिराग गार्डन, बारामती येथे दुपारी २.३० ते संध्याकाळी ७.३० या वेळात हा कार्यक्रम होणार आहे.**




नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर पाटील हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवतील, तर क्षत्रिय राजपूत करनी सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राज शेखावत, अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष संतोष नानवटे, सुप्रसिद्ध हिंदी हास्यकवी टी.व्ही. कलाकार शंभू शिखरजी, पराग बेडसे, महेश दास, प्रमोद राणाजी, संभाजी ब्रिगेडचे अमोल काटे, मुकुंद काकडे, प्रशांतनाना सातव, मनसेचे महाराष्ट्र उपाध्यक्ष आणि प्रसिद्ध विधिज्ञ सुधीर पाटसकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला असणार आहे.

याच कार्यक्रमात रणजीत ताम्हाणे लिखित ‘सुर्यवंशी सगर राजपूत मराठा’ या ऐतिहासिक पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे.

एक हजार वर्षांपूर्वी राजपूतान्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत झालेल्या सगर राजपूत समाजाचा काळाच्या पडद्याआड गेलेला मूळ इतिहास ताम्हाणे यांनी दीर्घ संशोधन करत सबळ पुराव्यांनिशी या पुस्तकातून मांडला आहे.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी समाजातील लोकांनी, तसेच इतिहासप्रेमी मंडळींनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संघटनेचे अध्यक्ष रणजीत ताम्हाणे यांनी केले आहे.

---

# मोदींच्या दौऱ्यानिमित्त पुणे शहरात सुरक्षा

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुणे दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पंतप्रधानांच्या सुरक्षेची जबाबदारी असलेले विशेष सुरक्षा पथक (एसपीजी), फोर्सवनचे जवान बंदोबस्तासाठी तैनात असणार आहे. पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात राहणार आहे. एसपीजीच्या अधिकाऱ्यांनी सुरक्षाव्यवस्थेचा आढावा घेतला. पंतप्रधान मोदी यांना एक ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पंतप्रधानांच्या हस्ते विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यात येणार आहे. पंतप्रधानांच्या दौऱ्यानिमित्त पोलीस तसेच प्रशासनाने बंदोबस्ताची आखणी केली आहे. पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक, अतिरिक्त आयुक्त प्रवीणकुमार पाटील, रामनाथ पोकळे, विशेष शाखेचे उपायुक्त पी. राजा आदींनी बंदोबस्ताची आखणी केली आहे. विशेष सुरक्षा पथकाने पंतप्रधानाच्या सुरक्षेचा आढावा घेतला आहे. हेलीकॉप्टर उतरवण्याचे ठिकाण (हेलीपॅड), कार्यक्रम स्थळ, तसेच पंतप्रधानांचा ताफा ज्या मार्गाने जाणार आहे. त्या मार्गाची पाहणी करण्यात आली आहे.

शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहे. पंतप्रधान श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दर्शनासाठी जाणार आहे. स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित कार्यक्रमात लोकमान्य टिळक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीपसिंह गिल मध्यभागातील बंदोबस्ताची जबाबदारी सांभाळणार आहेत. स. प. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला कार्यक्रम निमंत्रितासाठी असणार आहे. हा कार्यक्रम ऑनलाइन पद्धतीने पाहण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.


शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)
अजित भाऊ गव्हाणे
आपणास उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन
शुभेच्छुक: विनोद झांबरे
Ozone Envirotech




# या जिवंत मनूला आवरा...

**ज्यांच्या धडावर मस्तक आहे आणि मस्तकात मेंदू आहे अश्या प्रत्येक विचार करणाऱ्या व्यक्तीला मनुस्मृती मान्य असूच शकत नाही,स्त्रिया,शूद्र आणि अंत्यज यांच्या बद्दल मनुचे विचार किती निंदनीय आहेत हे कुणाला सांगण्याची गरज नाही,आपण कुणीही हा मनु बघितला नाही मात्र मनोहर भिडेच्या रुपात तो आजच्या काळात बघता येतो.**

बहुजन समाजातील कोणत्याही महापुरुष किंवा समाज सुधारक किंवा आमच्या प्रेरणा यांच्या बद्दल अतिशय विकृत शब्दात बदनामी करणारा भिडे छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांचा बहुजन समाजावर असलेला प्रभाव लक्षात घेऊन त्याच्या आड ओबीसी तरुणांचा मेंदू गुलाम करून त्यांचे रूपांतर मानवी रोबो मध्ये करण्याचे काम करीत आहे. गेली अनेक दशके राज्यात हे काम संघानंतर सनातन संस्था आणि मनोहर भिडे करतात. यांच्या मदतीला तश्या लहान मोठ्या अनेक संस्था काम करीत आहेत,देव,धर्माच्या नावावर कार्यरत असणारे अनेक पंथ,उपपंथ यांच्यातील महत्वाचे धर्मचार्य आणि मोहरे या व्यवस्थेने आपल्या प्रभावात घेतलेले आहेत.वारकरी आणि बहुजन समाजाला अतिशय आदरणीय असणाऱ्या कीर्तन आणि कीर्तनकार या व्यवस्थेत सुद्धा नियोजनबद्ध या लोकांनी घुसखोरी करून आपला अजेंडा राबवणे सुरू



केले आहे. सात-आठ वर्षं कोल्हापूर मधील इंद्रजीत सावंत आणि त्यांचे सहकारी मित्र, कार्यकर्ते शिव प्रतिष्ठानमय होऊन गेले होते. पण त्यांना वरिष्ठांची वागणूक खटकत होती. भिडे गुरुजी आणि त्यांच्या भोवतालच्या कार्यकर्त्यांचं बोलणं-वागणं यातून विसंगती दिसत होती.

इंद्रजीत सांगतात – "प्रतिष्ठानचे पंढरपूरचे एक कार्यकर्ते पुण्यात उच्चशिक्षण घेत होते. घरची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, शिकायला पैसे नाहीत म्हणून त्यांचं शिक्षण बंद पडायची वेळ आली होती. आम्हाला वाटे भिडे गुरुजींचं एवढं नाव, वजन आहे, पतंगराव कदम त्यांना मानतात. कदमांकडून कार्यकर्त्यांना शिष्यवृत्ती मिळाली असती. कदम अशा शिष्यवृत्त्या गरजूंना देत होते. पण त्यांच्याकडे भिडे गुरुजींनी शब्द टाकणं गरजेचं होतं. त्यांच्या एका शब्दावर हे काम झालं असतं. पण गुरुजींनी या प्रकरणात सरळ कानावर हात ठेवले. ते आपल्या अहोरात्र झटणाऱ्या कार्यकर्त्यासाठी एक शब्द वाया घालवायला तयार नव्हते. तिथं आमचा भ्रमनिरास व्हायला सुरुवात झाली. कार्यकर्त्याचं दु:ख नेत्याला दिसत नसेल तर ते संघटन कुचकामी आहे असं वाटायला लागलं."

बहुजन समाजातील मुलांना त्यांच्या शिक्षणात मदत न करणं, त्यांच्या करिअर, कुटुंबांबद्दल अनास्था दाखवणं हा शिव प्रतिष्ठानचा खाक्या इतरही अनेक प्रकरणांत इंद्रजीत आणि त्यांच्या सहकाऱ्यांना जाणवला. शिकून माणसं गांडू बनतात, मग शिकायचं कशाला, हा गुरुजींच्या सिद्धान्त आहे. या सिद्धान्तावर ठाम राहत गुरुजींनी लाखो बहुजन जातीतली मुलं नादाला लावली, संघटनेत भरती केली. त्यातल्या अनेकांची शिक्षणं अर्धवट सुटली. अनेकांचं करिअर बरबाद झालं. अनेकांवर हिंसाचार, दंगल, निदर्शनं, मारामाऱ्या या प्रकरणांत पोलिस केसेस झाल्या. इंद्रजीत आणि त्यांचे मित्र याचे प्रत्यक्ष साक्षीदार आहेत.

याविषयी इंद्रजीत कळवळून सांगतात – "खरं सांगू का, हा बहुजन मुलांना देशोधडीला लावण्याचा समजून-उमजून केलेला डाव आहे. बहुजनांच्या पोरांची आयुष्यं मातीमोल करायचा यांचा खरा धंदा आहे. मुस्लीम द्वेष शिकवून बहुजन पोरांना अतिरेकी करण्याचं यांचं कारस्थान आहे."

इंद्रजीत आणि त्यांच्या सहकाऱ्यांना गुरुजींचा अंदाज आला होता. पण त्यांना त्यांचा खरा चेहरा जेम्स लेन प्रकरणात उघड झाला. या काळातली या कार्यकर्त्यांची घुसमट खूप मोठी होती. या घुसमटीविषयी इंद्रजीत सांगतात, "जेम्स लेननं शिवाजी महाराजांविषयी विकृत लिखाण केलं. माँसाहेब जिजाऊंची बदनामी होत असताना भिडे गुरुजी चूप. त्यांच्याभोवतीचे शिवभक्त, शिवसैनिकही चिडीचूप. गुरुजींना याबाबत काहीही मार्गदर्शन केलं नाही. त्यांना विचारलं तर बोलायचं टाळलं. गुरुजींची ही लबाडी बघून आम्ही शिव प्रतिष्ठानचा त्याग केला आणि शिवराज्य मंच स्थापन केला.

## संपादकीय »

# डिजिटल उपवास

***माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट, संपर्क क्रांती आणि डिजिटलायझेशन या तिन्हींच्या घुसळणीमधून निर्माण झालेल्या विलक्षण परिस्थितीत भिरभिरणाऱ्या सध्याच्या जगाला युनेस्कोच्या 'ग्लोबल एज्युकेशन मॉनिटिरग' अहवालाने चार खडे बोल सुनावले ते बरेच झाले.***

माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट, संपर्क क्रांती आणि डिजिटलायझेशन या तिन्हींच्या घुसळणीमधून निर्माण झालेल्या विलक्षण परिस्थितीत भिरभिरणाऱ्या सध्याच्या जगाला युनेस्कोच्या 'ग्लोबल एज्युकेशन मॉनिटिरग' अहवालाने चार खडे बोल सुनावले ते बरेच झाले. अर्थात विज्ञान तंत्रज्ञानाला विरोध म्हणजे प्रगतीला विरोध अशी मानसिकता असलेल्या सध्याच्या जगात ते खडे बोल ऐकून घेण्याच्या आणि त्यावर काही उपाययोजना करण्याच्या मन:स्थितीत कोणी आहे का, हा मुद्दा वेगळा. पण यानिमित्ताने एकूणच शिक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञानाचा शिरकाव आणि त्याचे भावी पिढीवर होणारे परिणाम या मुद्दय़ांवर गांभीर्याने चर्चा करण्याची गरज आहे, एवढे जरी अधोरेखित झाले तरी पुष्कळच झाले म्हणायचे.

**भाषेचा वापर जसा करतो, तसा तो रूढ होत जातो. हल्ली राजकारणातील सनसनाटीसाठी 'भूकंप' हा शब्द वापरणं, हे रूढ होत चाललंय. आपण गेल्या काही दशकात खरेखुरे भूकंप अनुभवलेले आहेत. या भूकंपात सर्वस्व गमावलेले अनेकजण आजही आपलं आयुष्य नव्यानं उभं करताहेत. त्यामुळे निर्लज्ज राजकारण्यांसाठी भूकंप हा शब्द वापरताना, त्या भूकंपग्रस्तांच्या वेदना समजून घेण्याची संवेदनशीलता आपण गमावलीय का?**

# 'भूकंप' शब्द वापरताना

नुकताच महाराष्ट्रात बुलडाणा जिल्ह्यात महाभयानक अपघात झाला. त्यात २५ जण मृत्युमुखी पडले. मरण सांगून येत नाही. पण, इतकाही भयानक, भयावह मृत्यू कुणाच्या वाट्याला येवू नये, इतकं नियतीचे निर्दयी क्रौर्य त्या २५ अभागी जीवांनी अनुभवले. ते अघटीत मोठे होते. अख्ख्या देशातल्या सर्वच वृत्तपत्रांनी मुख्य हेडलाईन्स करून बातम्या दिल्या. जवळपास सर्वच वृत्तवाहिन्यांनी दिवसभर अपघाताची बातमी चालवली. अवघा महाराष्ट्र हळहळला. रविवारी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या प्रवशांच्या मृतदेहावर सामूहिक अंत्यसंस्कार करण्यात आले. ही बातमी सुरू असतानाच सगळीकडे अजित पवार यांच्या दुपारच्या शपथविधीची बातमी फ्लॅश व्हायला लागली आणि अंत्यविधीची बातमी मागे पडली. सोशल मीडिया वरही जिकडे तिकडे केवळ अजित पवारांचीच बातमी. त्या संदर्भातले मिम, जोक्स , व्हिडिओ सारं



व्हायरल व्हायला लागलं. सत्तानाट्याचं वार्तांकन करताना हे होणं स्वाभाविक आहे. असं घडू नये, ही देखील अपेक्षा नाही. जगाच्या सार्वजनिक आयुष्याचा पट इतका विशाल आहे, की एकाच घटनेच्या भोवती गुरफटून जाणे हे समाजाला शक्य नाही. मग ती घटना दुःखद असो, वा आनंदाची. पण, आदल्या दिवशीचा अपघात आणि त्याच्या दुःखद पार्श्वभूमीवर दुसऱ्याच दिवशीच्या राजकीय घडामोडींच्या बातम्या, त्यांच्या हेडलाईन्स पाहिल्या तर एक वेगळा मुद्दा नजरेत पडतो. तो म्हणजे बातम्या मधली शब्दयोजना. जवळपास सर्वच वृत्तपत्रांच्या ऑनलाईन पोर्टलवर 'महाराष्ट्रात राजकीय भूकंप ' 'महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप,' अशा हेडलाईन्स होत्या. कुठे कुठे तर महाभूकंप असाही शब्द वाचायला मिळाला. राजकारणात जे घडलं ते खरच अत्यंत धक्कादायक आहे, हे सत्य आहे. पण ते अनपेक्षित नाही. कधीतरी जे होणार होते, ते घडले. शिवसेनेच्या फुटलेल्या आमदारांच्या पात्रतेसंदर्भात पुढल्या महिन्यात निर्णय येणे अपेक्षित आहे. तोपर्यंत असेच धक्के आणखी बसणार आहेत. त्याही नंतर अशा घटना घडतच राहणार आहे. काही अपेक्षित असतील, काही अनपेक्षित. आणि त्यालाच राजकीय भूकंपाचे धक्के म्हणून आपल्याला बातम्यांमतून सांगितले जाणार आहे. राजकीय बातम्यांचे वृत्तांकन करताना, बातम्या ऐकताना, वाचताना भूकंप या शब्दाची आता शिसारी यायला लागली आहे. या शिसारीला शब्दाची आवड - निवड कारणीभूत नाही. तर त्यामागचे कारण आहे, भूकंप या शब्दासोबत येणारा त्याचा अर्थ. त्या अर्थासोबत अंगावर येणारा काटा. ती घटना. भूकंपाचे क्षण.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥

नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# दुसऱ्याकडे असला तर मळ, भाजपात आल्यावर 'कमळ'

## » हुकुमशाहीपुढे झुकणार नाही : उद्धव ठाकरेंची टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आम्हाला विकास हवा पण गुलामगिरी नको, दुसऱ्याकडे असला तर मळ, भाजपात आल्यावर 'कमळ' हा कुठला न्याय आहे. मी कधीही हुकुमशाहीपुढे झुकणार नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाजपवर घणाघात केला. तर मणिपूर घटनेवरून त्यांनी केंद्रसरकारच्या भूमिकेला धृतराष्ट्राची उपमा दिली. तर बाजारात चायनीज माल आला असून खरे शिवसैनिक माझ्यासोबत आहे, असे म्हणत शिंदेसेनाला देखील टोला लगावला.**



शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या वतीने आज ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतन येथे हिंदी भाषी कार्यकर्त्यांचं संमेलन आयोजित करण्यात आले होते.यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. तर त्यांनी भाजप-शिंदेगटांवर जोरदार निशाणा साधला. उद्धव ठाकरे म्हणाले की, हिंदुत्व काय आहे? फक्त मंदिरमध्ये जाणारा घंटा बडवणारा हिंदू नकोय. आम्हाला अतिरेक्यांना मारणारा हिंदू हवा आहे. आमची वज्रमूठ सभेला सर्व जातीचे लोक आले होते. या लोकांनी नकली हिंदूंनी सभास्थळी जावून गोमूत्र शिंपडलं. अरे माणसासारखी माणसं सभेला आली होती आणि त्यांना तुम्ही अपित्र मानता? आमचं हिंदुत्व हे हृदयात राम आणि हातात काम असं आमचं हिंदुत्व आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी सत्ताधारी भाजप सरकारला सुनावले. यावेळी त्यांनी मणिपूरच्या घटनेवरुन केंद्र सरकारला ध्रुतराष्ट्राची उपमा दिली. माणसा-माणसामध्ये भेद करणाऱ्याचा मुखवटा फाडून काढायचा आहे. मणिपूर जळत आहे. हेच आपलं हिंदू राष्ट्र आहे? मी मुख्यमंत्री असताना हनुमान चालीसा बोलायचं सुरु होतं. ज्या हनुमानने सीतेसाठी लंका जाळली, सीता हरण झालं म्हणून रामायण घडलं, द्रौपदीचं वस्त्रहरण झालं म्हणून महाभारत घडलं, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

दु:खाची गोष्ट तर हीच आहे की, द्रौपदीचं वस्त्रहरण झालं तेव्हा तिथे ध्रुतराष्ट्र राजा बसले होते. त्यांना दृष्टी नव्हती. आजचं सरकार जे बसलं आहे ते ध्रुतराष्ट्र आहे. आपल्याही देशात दोन महिलांसोबत जे केलं ते व्हिडीओमुळे समोर आलं. तिथले मुख्यमंत्री म्हणत आहेत की, अशा घटना भरपूर घडल्या आहेत. अरे लाज वाटली पाहिजे, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी सुनावलं. राष्ट्रपती महिला आहेत, काय करत आहेत? मी महामहीम राष्ट्रपतींना विचारु इच्छितो, राष्ट्रपती महोदया तुम्ही ज्या राष्ट्रपती आहेत त्या देशातील महिलांची आब्रू भर रस्त्यावर लुटली जात आहे. आपल्याला काही संवेदना नाहीत का? तिथल्या राज्यपाल महिला आहेत. त्या काहीच करत नाहीत. आमच्या इथे जे राज्यपाल होते ते कशी मस्ती करत होते. त्यांना पाठवा तिथे. मंदिर उघडा ते उघडा. कोरोना संकट एवढं सोपं होतं का? असे राज्यपाल तिकडे का पाठत नाहीत? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.

### पंतप्रधान महाराष्ट्रात गद्दारांसोबत बसणार

» मी विरोधी पक्षांची एकजूट मानत नाही तर ज्या सर्व पक्षांची एकजूट झालीय तिचं नाव इंडिया आहे. पण इंडियावरही त्यांनी टीका केली. त्यांनी इंडिया मुजाहीद्दीन म्हणत टीका केली. पंतप्रधान एक-दोन दिवसात महाराष्ट्रात येणार आहेत. गद्दारांसोबत बसणार आहेत. त्यांचा सत्कार करणार आहेत. हेच आपलं हिंदुत्व आहे, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.

# 'राष्ट्रपिता महात्मा गांधीजींसारखा दुसरा होणे नाही'

## » भिडेंना राज ठाकरेंचा अप्रत्यक्ष टोला; अधिकृत पेजवर पोस्ट शेअर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यावर आक्षेपार्ह बोलणारे शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संघटनेचे प्रमुख संभाजी भिडे यांच्यावर मनसेकडून अप्रत्यक्ष निशाणा साधण्यात आला आहे. मनसेच्या अधिकृत ट्विटवरून राज ठाकरेंची एक जुनी पोस्ट ट्विट करत 'गांधीजींसारखा दुसरा कोणी होणे नाही' अशा शब्दांत त्यांना अभिवादन केले गेले.**



मनसे अधिकृत या ट्विटर हँडलवरुन राज ठाकरेंची ही जुनी पोस्ट शेअर करण्यात आली आहे. आज गांधीजींचा जन्मदिवस नाही किंवा स्मृतीदिनही नाही. पण तरीही गांधीजी सध्या चर्चेत आहेत. ते म्हणजे संभाजी भिडेंच्या आक्षेपार्ह विधानामुळे. यापार्श्वभूमीवरच मनसेने ही पोस्ट शेअर केल्याने ही चर्चा सुरू झाली आहे. पोस्टमध्ये लिहिले की, राज ठाकरेंनी 2 ऑक्टोबर 2022 ला 'महात्मा गांधीं'वर लिहिलेली एक अप्रतिम अभिवादनपर पोस्ट.

महात्मा गांधी हे गेल्या शतकातील एकमेव असं नेतृत्व असेल की, जे देशांच्या सीमा तोडून पसरत गेलं तेही इंटरनेट, सोशल मीडिया, मोबाईल नसताना. गांधींजींचा प्रभाव असा काही पसरत गेला की, फक्त भारतच नव्हे तर जवळपास तीन खंडातील देशांमध्ये स्वातंत्र्याची आस जागृत झाली आणि ब्रिटिश राजवटीचा सूर्य मावळला. पण जे गांधीजींना जमलं ते पुढे जवळजवळ कोणालाच जमलं नाही.

### काय म्हणाले होते संभाजी भिडे?

» अमरावतीच्या बडनेर येथे झालेल्या कार्यक्रमात बोलताना संभाजी भिडेंनी महात्मा गांधींचे वडील करमचंद गांधी यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले आहे. करमचंद गांधी हे मोहनदास अर्थात गांधीजींचे खरे वडील नसून ते एका मुस्लीम जमीनदाराचे पुत्र होते, असं वक्तव्य संभाजी भिडेंनी केलं होतं. इतकेच नाही तर मोहनदास यांचा सांभाळ व शिक्षणही त्याच मुस्लीम पालकानं केल्याचा दावा देखील भिडेंनी केला होता. दरम्यान, या विधानामुळं मोठं वादंग निर्माण झालं असून काँग्रेस नेते आक्रमक झाले असून त्यांच्या अटकेची मागणी केली आहे. भिडेंविरोधात अमरावत गुन्हा देखील दाखल झाला आहे.

# इम्फाळमध्ये मैतेईंचा मोर्चा

## »मणिपूरमधील हिंसाचार तपास आता सीबीआयकडे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मणिपूरमध्ये दोन महिलांवर झालेल्या सामूहिक लैंगिक अत्याचाराचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपविण्यात आला. तर दुसरीकडे कुकींसाठी स्वतंत्र प्रशासनाच्या मागणीविरोधात इम्फाळमध्ये मोर्चा काढण्यात आला आणि त्याचवेळी विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीचे शिष्टमंडळही राज्यात पोहोचले.**



केंद्रीय गृहमंत्रालयाच्या निर्देशांवरून हे प्रकरण 'सीबीआय'कडे सोपवण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मणिपूरमधील हिंसाचाराशी संबंधित सहा प्रकरणांचा तपास करण्याची जबाबदारी देण्यात आलेल्या 'सीबीआय'कडे याही प्रकरणाचा तपास सोपवण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. दरम्यान, कुकी समाजाचे वास्तव्य असलेल्या भागांसाठी 'स्वतंत्र प्रशासन' निर्माण करण्याच्या मागणीविरोधात 'मणिपूर एकात्मता समन्वय समिती'च्या वतीने शनिवारी इम्फाळमध्ये मोर्चा काढण्यात आला. मणिपूरची प्रादेशिक एकात्मता कायम ठेवण्याची मागणी करत पाच जिल्ह्यांतील हजारो नागरिक मोर्चात सहभागी झाले होते. हातात निषेधाचे फलक घेतलेल्या निदर्शकांनी स्वतंत्र प्रशासनाची मागणी करणाऱ्यांविरोधात आणि म्यानमारमधील कथित घुसखोरांच्या विरोधात घोषणाबाजी केली.

चिन-कुकी-झोमी आदिवासींचे संरक्षण करण्यात प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप करीत मणिपूरमधील कुकी समाजातील दहा आमदारांनी कुकींसाठी स्वतंत्र प्रशासनाची मागणी केली होती. वेगळय़ा प्रशासनाची मागणी करणाऱ्या कुकी समुदायातील आमदारांनी 'वेगळे प्रशासन' म्हणजे काय आणि ते कोणत्या भागासाठी ते स्पष्ट केलेले नाही. तर मैतेईंचा मोर्चा काढणारी समितीही, सध्या दिल्लीत गृह मंत्रालयाचे पथक आणि पूर्वाश्रमीच्या कुकी बंडखोरांमध्ये सुरू असलेल्या कथित चर्चेच्या विरोधात असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, मणिपूरमधील 'इंडिजिनस ट्रायबल लीडर्स फोरम' या आदिवासींच्या संघटनेने शनिवारी विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीला पत्र लिहून राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या आणि स्वतंत्र प्रशासनाच्या मागणीला पाठिबा देण्याची मागणी केली. मणिपूरच्या एकूण लोकसंख्येत मैतेईंचे प्रमाण ५३ टक्के. बहुतेक मैतेईंचे वास्तव्य इम्फाळ खोऱ्यात आहे. तर आदिवासी – नागा आणि कुकी यांचे लोकसंख्येतील प्रमाण ४० टक्के असून ते डोंगराळ जिल्ह्यांमध्ये राहतात.

### शनिवारचा घटनाक्रम..

» मणिपूरमध्ये ४ मे रोजी जमावाने दोन महिलांची विवस्त्रावस्थेत धिंड काढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. त्या घटनेची चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर देशभर संतापाची लाट उसळली होती.'कुकींसाठी 'स्वतंत्र प्रशासन' करण्याच्या मागणीविरोधात मैतेईंच्या संघटनांचा मोर्चा. 'विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीच्या खासदारांचे पथक मणिपूरमध्ये दाखल, हिंसाचारग्रस्त भागाला भेट. 'राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करून स्वतंत्र प्रशासन निर्माण करण्याच्या मागणीला पाठिबा देण्याची 'इंडिया' आघाडीकडे कुकी समाजाची मागणी.

# बेकायदेशीर राहणाऱ्या नागरिकांची ओळख पटणार

## »मणिपूरला येणाऱ्या लोकांचा बायोमेट्रिक डेटा घेणे सुरू

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मणिपूर सरकारने शनिवारी म्यानमारमधून राज्यात येणाऱ्या लोकांचा बायोमेट्रिक डेटा घेणे सुरू केले. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात येत आहे. मणिपूरमध्ये बेकायदेशीरपणे राहणाऱ्या म्यानमारच्या नागरिकांची ओळख पटवणे हा त्याचा उद्देश आहे. हे काम सप्टेंबर 2023 पर्यंत पूर्ण करण्यास सांगितले आहे.**

बायोमेट्रिक ओळखीचे काम यापूर्वीही सुरू होते, मात्र राज्यातील हिंसाचारामुळे ते थांबवण्यात आले होते. केंद्रीय गृहमंत्रालयाने नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या अधिकाऱ्यांची एक टीम मणिपूरला पाठवली आहे जेणेकरून तेथील अधिकाऱ्यांना डेटा गोळा करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल.

यापूर्वी, इंडियन नॅशनल डेव्हलपमेंट इनक्लुसिव्ह अलायन्स (इंडिया) च्या खासदारांनी हिंसाचारग्रस्त मणिपूरला भेट दिली आणि हिंसाचार पीडितांची भेट घेतली. हा दौरा दोन दिवसांचा आहे. 'इंडियन नॅशनल डेव्हलपमेंट इनक्लुसिव्ह अलायन्स' (इंडिया) विरोधी आघाडीच्या 21 खासदारांचे शिष्टमंडळ शनिवारी (29 जुलै) मणिपूरला पोहोचले. यानंतर खासदारांचे पथक चुरचंदपूर येथे पोहोचले. येथे त्यांनी मदत शिबिरातील हिंसाचारग्रस्तांची भेट घेतली. हे खासदार 30 जुलैपर्यंत येथे मुक्काम करतील आणि तेथील परिस्थितीचा आढावा घेतील. राज्यात तीन महिन्यांपासून सुरू असलेला हिंसाचार आणि येथील लोकांच्या समस्यांवर तोडगा काढण्याबाबतही ते सरकार आणि संसदेत आपले मत मांडणार आहेत.



दरम्यान, सीबीआयने शनिवारी (29 जुलै) मणिपूरमध्ये दोन महिलांची नग्न परेड केल्याप्रकरणी एफआयआर नोंदवून तपास सुरू केला. या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्याबाबत केंद्र सरकारने २७ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले होते. यासोबतच प्रतिज्ञापत्र दाखल करून या प्रकरणाची सुनावणी मणिपूरबाहेर करण्याचे आवाहनही करण्यात आले.

### मोदी येतात, आम्ही त्यांना कंपनी देऊ

भारतातील खासदारांची आणखी एक टीम चुरचंदपूर येथील डॉन बॉस्को शाळेत उभारण्यात आलेल्या मदत शिबिरात पोहोचली. येथे काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई म्हणाले की, ज्यांनी त्यांना या स्थितीत आणले त्यांना येथील लोक कधीही माफ करू इच्छित नाहीत. त्याचे जीवन सामान्य करण्यासाठी अनेक पावले उचलावी लागतात. केंद्रावर निशाणा साधत गोगोई म्हणाले की, सरकार म्हणत आहे की मणिपूरमधील परिस्थिती पूर्वपदावर येत आहे, परंतु लोक पुन्हा छावण्यांमध्ये का राहत आहेत. लोकांना त्यांच्या घरी का परतायचे नाही? जनतेचा सरकारवर विश्वास नसल्याचे स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी मणिपूरला आले तर आम्ही (भारताचे शिष्टमंडळ) त्यांना कंपनी देऊ, असेही गोगोई म्हणाले.

# दारूचे व्यसन नसते तर मी मोठा सुपरस्टार असतो



अलीकडेच चेन्नईमध्ये रजनीकांत यांच्या 'जेलर' चित्रपटाचा ऑडिओ लॉन्च कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी अभिनेत्याने त्याच्या आयुष्याशी संबंधित अनेक गोष्टी शेअर केल्या. यादरम्यान तामिळ सुपरस्टार त्यांच्या मद्यपानाच्या समस्येबद्दल उघडपणे बोलले आणि ही त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक असल्याचे म्हटले. रजनीकांत यांनी चाहत्यांना दारूचे व्यसन न करता जबाबदारीने त्याचा आनंद घेण्यास सांगितले. ते म्हणाले, माझ्या आयुष्यात दारू नसती तर मी समाजाची चांगली सेवा केली असती. दारू पिणे ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक आहे. दारू नसती तर मी आपल्या करिअरमध्ये खूप चांगली कामगिरी केली असती आणि आजच्यापेक्षाही मोठा स्टार बनलो असतो असेही ते म्हणाले 2018 मध्ये रिलीज झालेल्या 'काला' या चित्रपटात रजनीकांत दारूबंदीबद्दल बोलले होते. चित्रपटात, मद्यधुंद अवस्थेत त्यांच्या निष्काळजीपणामुळे त्यांचे पात्र पत्नी गमावते. अभिनेत्याने दारूच्या दुष्परिणामांबद्दल बोलण्याची ही पहिलीच वेळ होती. पूर्वीपर्यंत ते दारू आणि सिगारेटला स्टाइल स्टेटमेंट म्हणून सादर करायचे. याशिवाय रजनीकांत यांनी या कार्यक्रमात त्यांना मिळालेल्या 'सुपरस्टार' खिताबबद्दलही सांगितले. अभिनेत्याने सांगितले की, त्यांना त्यांच्या नावातून हे शीर्षक हटवायचे आहे. त्यांनी निर्मात्यांना हे शीर्षक काढून टाकण्याची विनंती देखील केली परंतु त्यांनी तसे करण्यास नकार दिला. याशिवाय रजनी या कार्यक्रमात 'जेलर' दिग्दर्शक नेल्सन यांच्या मागील 'बीस्ट' या चित्रपटाबद्दलही बोलले. त्यांनी सांगितले की विजय स्टारर 'बीस्ट'साठी समीक्षक आणि प्रेक्षकांनी दिग्दर्शक नेल्सनवर टीका केली होती. यानंतर नेल्सन यांना 'जेलर'मधून काढून टाकले जाईल अशी चर्चा होती, पण त्यांनी नेल्सनवर विश्वास ठेवला. दुसरीकडे, टीकेनंतरही 'बीस्ट'ही हिट ठरला आणि वितरकांचे कोणतेही नुकसान झाले नाही.

# महाराष्ट्राची हास्यजत्रा परत

महाराष्ट्राची हास्यजत्रा हा प्रेक्षकांचा लाडका शो. बस, ट्रेन असो की चालु प्रवासात महाराष्ट्राची हास्यजत्रा शो प्रेक्षक आवर्जुन पाहतात. महाराष्ट्राची हास्यजत्रा शो काही दिवसांपासुन ब्रेकवर होता.पण महाराष्ट्राची हास्यजत्रा शो पाहण्याऱ्यांसाठी खुशखबर आहे. महाराष्ट्राची हास्यजत्रा पुन्हा एकदा त्याच दिमाखात सुरु आहे. महाराष्ट्राची हास्यजत्रा शोचा नवीन प्रोमो रिलीज झालाय. या ब्लॅक अँड व्हाईट प्रोमोत दत्तु मोरे, ईशा डे, शिवाली परब, प्रियदर्शनी इंदलकर, समीर चौगुले आणि वनीता खरात दिसत आहेत.
पोट धरून आणि पोट भरून हसवण्यासाठी तुमचे लाडके विनोदवीर आहेत तयार! ‘महाराष्ट्राच्या हास्यजत्रेत’ तुमचं सहकुटुंब स्वागत... पाहा, 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' - सहकुटुंब हसू या! असं कॅप्शन देत हा प्रोमो शेअर करण्यात आलाय महाराष्ट्राची हास्यजत्रा हा शो 14 ऑगस्टपासून, सोम.-गुरु., रात्री 9 वा. सोनी मराठी वाहिनीवर पहायला मिळणार आहे सध्या महाराष्ट्राची हास्यजत्रा शोचे कलाकार अमेरिका दौऱ्यावर गेले होते. अमेरिकेतल्या मराठी प्रेक्षकांना महाराष्ट्राची हास्यजत्रा शो मधील कलाकारांनी खळखळुन हसवलं. अमेरिकेत प्रियदर्शना गेली होती तेव्हा तिने पोस्ट शेअर केली होती.प्रियदर्शनीने शेवटी लिहीलं.. त्या दिवशी हास्यजत्रेची पुण्याई कळाली. जवळपास ९०० लोक, SOLD OUT SHOW, २ तास आमची वाट पाहत होते आणि टाळ्यांच्या गजरात आमचं स्वागत झालं. खूप लांबून लोक आले होते आणि सगळे थांबले होते. हास्यजत्रेवरचं हे प्रेम पाहुन आम्ही सगळे भारावुन गेलो होतो. आमच्या संपूर्ण टीम ची आठवण काढली. मी नशिबवान आहे की या TEAMचा भाग आहे. USA TOUR मधल्या NJ च्या शो साठी केलेली धावपळ आणि त्यावरचा प्रतिसाद हा कायम आठवणीत राहील.



# आकांक्षाच्या आईची आकांक्षा

भोजपुरी अभिनेत्री आकांक्षा दुबे हिने आत्महत्या करत आपलं जिवन संपवलं होतं. वाराणसीतील एका हॉटेलमध्ये तिचा मृतदेह सापडला आहे. आता आकांक्षाच्या मृत्यूला 4 महिने झाले मात्र तरीही या प्रकरणाचा अद्याप तपास सुरु आहे. आता आकांक्षाच्या आईनं एक व्हिडिओ शेयर केला आहे. ज्यात तिने तिच्या लेकीसाठी न्याय मागितला आहे. आकांक्षा दुबेच्या आईने तिच्याच इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेयर केला आहे. ज्यामध्ये ती आपल्या मुलीला न्याय मिळावा म्हणून आक्रोश करतांना दिसली. या व्हिडिओत आकांक्षाची आई म्हणते की, तिच्या मुलीच्या मृत्यूला ४ महिने झाले आहेत, पण तिच्या मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी भोजपुरी इंडस्ट्रीतुन कोणीही पुढे आलेलं नाही. प्रत्येकजण स्वतःमध्ये व्यस्त आहे . सगळे गप्प का आहेत. कोणीही काहीही बोलायला पुढे येत नाहीत. माझी मुलगी आकांक्षा भोजपुरी इंडस्ट्रीला तिचं कुटुंब मानायची. तिचं कुटुंब आता कुठे गेले? जे माझ्या मुलीला न्याय मिळवून देऊ शकतो. आकांक्षाची आई व्हिडिओमध्ये असेही म्हणते की, पवन सिंह , राकेश मिश्रा माझ्या घरी आले मात्र माझ्या मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी पुढे का आला नाही? तिची आई सीबीआय चौकशीची मागणी करत आहे. त्यांनी या व्हिडिओत समर सिंग आणि संजय सिंग यांच्यावर आरोप केले आहेत. त्यांनी आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. आकांक्षा दुबेच्या मृत्यूप्रकरणी तिच्या आईने भोजपुरी गायक समर सिंह आणि त्याचा सहकारी संजय सिंह यांच्यावर हत्येचा आरोप केला ,त्यांनी आकांक्षावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हाही दाखल केला आहे. यापुर्वीही आकांक्षा दुबे आत्महत्या प्रकरणात समर सिंहवर आकांक्षाच्या कुटूंबाने गंभीर आरोप केले आहेत. समर सिंह त्यांच्या मुलीला धमकावत असल्याचा आरोप मामा, मावशी आणि आजोबांनी केला आहे.

# करण जोहरची काढली लाज

बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंग आणि आलिया भट्ट यांचा रोमँटिक चित्रपट 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' शुक्रवारी रिलिज झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. करण जोहरने तब्बल सात वर्षांच्या ब्रेकनंतर चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. आता बॉलिवूडची पंगा क्विन कंगना रणौत हिने या चित्रपटावर रिव्ह्यू दिला आहे. करण जोहरचा चित्रपट आणि त्यातच आलिया अन् रणवीर असल्यावर कंगना गप्प कशी बसणार तिनं लांबलचक पोस्ट शेयर करत या चित्रपटबाबत तिचं मत व्यक्त केलं. तिने तिच्या पोस्टमध्ये बॉलिवूडवर , करणवर आणि रणवीरवर टिकेचे बाण सोडले आहे.
कंगना तिच्या पोस्टमध्ये लिहिते की, 'भारतीय प्रेक्षक अण्वस्त्रांची उत्पत्ती आणि अणुविज्ञानावरील तीन तासांचा चित्रपट पाहत आहेत आणि इथे नेपो गँगचं तेच सास बहूचं रडगाणं, पण त्यांना हा डेली सोप ड्रामा बनवण्यासाठी 250 कोटींची गरज का?
करण तुला लाज वाटली पाहिजे तोच चित्रपट पुन्हा बनवायला.



# 'ताली' चा टीझर रिलीज

सुष्मिता सेनची मोस्ट अवेटेड वेब सिरीज तालीचा टीझर रिलीज झाला आहे. या सिरीजमध्ये ही अभिनेत्री ट्रान्सजेंडर कार्यकर्त्या गौरी सावंतची भूमिका साकारणार आहे. तिच्या इंस्टाग्रामवर टीझर शेअर करताना सुष्मिताने कॅप्शनमध्ये लिहिले की, "गाली से ताली तक के सफर की ये कहानी। पेश है भारत के तीसरे लिंग के लिए श्रीगौरी सावंत की लड़ाई की कहानी।' व्हिडिओमध्ये सुष्मिताचा दमदार अभिनय पाहायला मिळाला. अभिनेत्री कपाळावर मोठी बिंदी आणि साडी नेसलेली दिसत आहे. तिला आयुष्यात तीन गोष्टी हव्या आहेत असं ती म्हणते. स्वाभिमान, सन्मान आणि स्वतंत्र म्हणजे स्वातंत्र्य. ट्रान्सजेंडरच्या भूमिकेत सुष्मिताने चाहत्यांना खूप प्रभावित केले आहे. ही मालिका स्वातंत्र्य दिनानिमित्त 15 ऑगस्ट रोजी OTT प्लॅटफॉर्म JIO CINEMA वर प्रदर्शित होणार आहे.

# सेन उपांत्य फेरीत पराभूत

## » जोनाथनने दुसऱ्यांदा बाजी मारली; भारताचे आव्हान संपले

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतीय शटलर लक्ष्य सेन BWF जपान ओपन सुपर 750 मधून पुरुष एकेरीत पराभूत होऊन बाहेर पडला. शनिवारी जागतिक क्रमवारीत 8व्या स्थानावर असलेल्या इंडोनेशियाच्या जोनाथन क्रिस्टीने उपांत्य फेरीत जागतिक क्रमवारीत 13व्या स्थानावर असलेल्या लक्ष्याचा पराभव केला. यासह भारताचे स्पर्धेतील आव्हानही संपुष्टात आले.**



क्रिस्टीने 2021 वर्ल्ड चॅम्पियनशिप कांस्यपदक विजेत्या लक्ष्यचा 15-21, 21-13, 21-16 असा पराभव केला. हा सामना एक तास सहा मिनिटे चालला. लक्ष्यने या महिन्याच्या सुरुवातीला कॅनेडियन ओपन सुपर 500 चे विजेतपद पटकावले होते. क्रिस्टीने दुसऱ्यांदा लक्ष्यचा पराभव केला आहे. दोघांमधील हा तिसरा सामना होता. यापूर्वी दोन्ही खेळाडूंमध्ये हेड टू हेड रेकॉर्ड 1-1 असा होता. याआधी शुक्रवारी, सात्विकसाईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी ही भारतीय जोडीही पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत पराभूत होऊन जपान ओपनमधून बाहेर पडली. जागतिक क्रमवारीत-2 जोडीला सलग 12 विजयानंतर पराभवाचा सामना करावा लागला. पीव्ही सिंधूला बुधवारी पहिल्या फेरीत चीनच्या झांग यी मॅनकडून 21-12, 21-13 ने पराभूत झाल्यानंतर स्पर्धेबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. हा सामना 32 मिनिटे चालला. झांग यी मॅनने दोन्ही गेम सहज जिंकले. यापूर्वी कोरिया ओपन 2023 मध्येही त्याला पहिल्या फेरीतच पराभवाला सामोरे जावे लागले होते.

### सात्विक-चिराग जोडीही बाहेर

भारतीय शटलर लक्ष्य सेन BWF जपान ओपन सुपर 750 मधून पुरुष एकेरीत पराभूत होऊन बाहेर पडला. शनिवारी जागतिक क्रमवारीत 8व्या स्थानावर असलेल्या इंडोनेशियाच्या जोनाथन क्रिस्टीने उपांत्य फेरीत जागतिक क्रमवारीत 13व्या स्थानावर असलेल्या लक्ष्याचा पराभव केला. यासह भारताचे स्पर्धेतील आव्हानही संपुष्टात आले. पॅरिस ऑलिम्पिकच्या पात्रता क्रमवारीवर जपान ओपनचा परिणाम होऊ शकतो. जपान ओपनचे निकाल पॅरिस ऑलिम्पिकच्या पात्रता फेरीसाठी 2024 च्या क्रमवारीत मोजले जातील. बॅडमिंटनसाठी पात्रता खिडकी यावर्षी 1 मे पासून सुरू झाली आहे.

# सुनील छेत्रीला एशियन गेम्समधून वगळले

## » अंडर-23 टीमसह 3 सीनियर पाठवू शकतात; संधूचाही समावेश नाही

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतीय कर्णधार सुनील छेत्री, गोलरक्षक गुरप्रीत सिंग आणि संदेश झिंगन यांना आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पुरुष फुटबॉल संघातून वगळण्यात आले आहे. आशियाई खेळांसाठी फुटबॉलमध्ये अंडर-23 च्या वरील फक्त तीन खेळाडूंना पाठवू शकतो. महिला संघासाठी वयोमर्यादा नाही.**

मात्र, त्यांची चूक लक्षात घेत भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) आयोजकांना सुनील छेत्री, गुरप्रीत सिंग आणि संदेश झिंगन यांची नावे जोडण्याची विनंती केली आहे. या तीन खेळाडूंची नावे जोडण्यासाठी आम्ही अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहोत, असे सचिव शाजी प्रभाकरन यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

आम्हाला परवानगी मिळेल अशी आशा आहे. मिडफिल्डर महेश सिंग नौरेम, बचावपटू रोशन सिंग नौरेम आणि बचावपटू आशिष राय यांचा आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी अंडर-23 आणि त्यावरील खेळाडूंमध्ये समावेश करण्यात आला आहे. 2022 मध्ये आशियाई क्रीडा स्पर्धा होणार होत्या. कोरोनामुळे एक वर्ष पुढे ढकलले.

या प्रकरणात, वय 2022 नुसार मानले जाईल. या 3 खेळाडूंचे वय सध्या 24 वर्षे आहे, मात्र वयोमर्यादेनुसार तिघेही अंडर-23 खेळू शकतात.

याशिवाय सर्व खेळाडूंचे वय 23 वर्षे किंवा त्यापेक्षा कमी आहे.




एआयएफएफचे अध्यक्ष कल्याण चौबे यांनी सांगितले की, आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी फुटबॉल संघ पाठवण्याची विनंती मंत्रालयाला करण्यात आली तेव्हा या तीन खेळाडूंना विचारण्यात आले. त्यावेळी त्यांनी नकार दिला.

नंतर या तिन्ही खेळाडूंनी संमती दिली. अशा स्थितीत 22 खेळाडूंच्या यादीत या तीन खेळाडूंची नावे वगळली गेली. हे लक्षात आल्यानंतर या तीन खेळाडूंची नावे समाविष्ट करण्यासाठी आम्ही आयोजकांशी संपर्क साधत आहोत. आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रीडा मंत्रालयाच्या नियमांनुसार केवळ तेच खेळाडू आणि संघ सहभागी होण्यासाठी जाऊ शकतात.

जे आशियाई क्रमवारीत टॉप-8 मध्ये सामील होतात.

भारतीय फुटबॉलची आशियाई क्रमवारी -18 आहे. त्यामुळे क्रीडा मंत्रालयाने भारतीय फुटबॉल संघाला आशियाई क्रीडा स्पर्धेत जाण्यास नकार दिला. नंतर, मंत्रालयाने भारतीय फुटबॉल महासंघाला फुटबॉल संघाच्या अलीकडील कामगिरीच्या आधारे पाठवण्याची विनंती केली होती.

भारतीय फुटबॉलने अलीकडेच SAFF चॅम्पियनशिप आणि आंतरखंडीय चॅम्पियनशिप जिंकली होती.

### एशियाडसाठी पुरुष फुटबॉल संघ

भारतीय कर्णधार सुनील छेत्री, गोलरक्षक गुरप्रीत सिंग आणि संदेश झिंगन यांना आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पुरुष फुटबॉल संघातून वगळण्यात आले आहे. आशियाई खेळांसाठी फुटबॉलमध्ये अंडर-23 च्या वरील फक्त तीन खेळाडूंना पाठवू शकतो. महिला संघासाठी वयोमर्यादा नाही अन्वर अली, गुरमीत सिंग, लालेंगमाविया, नरेंद्र, रहीम अली, लालनुंतलुंगा बावितलुंग, रोहित दानू, प्रभसुखान सिंग गिल, अनिकेत अनिल जाधव, राहुल कन्नोली प्रवीण, अमरजीत सिंग कियाम, आकाश मिश्रा, धीरज सिंग मोइरांगथेम, थोयबा सिंग, महेश सिंग, ना. रोशन सिंग नौरेम, शिवशक्ती नारायणन, आशिष राय, विक्रम प्रताप सिंग, दीपक टांगरी, जॅक्सन सिंग थौनाओजम, सुरेश वांगजाम.